**सी.एन.आर.क्र. एम.एच.एस.आय ०९-०००३३६-२०२२**

**नियमित दिवाणी दावा क्र.७७/२०२२**

**निशाणी क्र.१०१ वरील आदेश**

प्रस्ततुचा अर्ज वादी यांनी जाहिर नोटीस देणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचे अर्जात असे कथन केले आहे की, सदरहू कामातील सामनेवाला क्र.१२ हे मयत असलेबद्दल बेलीफ अहवाल मे. न्यायालयात दाखल झालेला आहे. वादीने बराच प्रयत्न करून देखील प्रतिवादी क्र.१२ चे वारस वादीला सापडू शकलेले नाहीत व त्याबद्दलची माहिती अद्याप देखील वादीला मिळू शकलेली नाही. सदर प्रतिवादीचे नाव दावा मिळकतीच्या सातबाराला नमुद असलेकारणाने त्यांना योग्य पक्षकार म्हणून सामील केलेले आहे. तरी न्यायपुर्ततेकरिता प्रतिवादी क्र.१२ यांचे वारस हयात असल्यास या दाव्याची माहिती त्यांना मिळणे आवश्यक व जरूरीचे आहे. तरी त्यासाठी तशी जाहिर नोटीस 'तरूण भारत सिंधुदुर्ग आवृती' या वर्तमानपत्रात देणेचा आदेश व्हावा ही विनंती केली आहे.

३. प्रतिवादीने सदर अर्जावर येथे म्हणणे देऊन विरोध दर्शविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार सदरच्या अर्जात प्रतिवादी क्र.१२ हे मयत आहेत.परंतु सामनेवाले यांचे वारस रेकॉर्डवर न आणताच जाहीर नोटीसस द्वारे बजावणी करावयाची कायदयात तरतुद नाही. सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. वादीचा अर्ज पाहता, प्रतिवादी क्र.१२ यांचे वारस हयात असल्यास या दाव्याची माहिती त्यांना मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे. परंतु सदरचा अर्ज कोणत्या कलमांतर्गत केला आहे याबाबत वादी याने कथन केले नाही. अर्जातील कारण हे संयुक्तीक नाही. सबब, मी

खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

– **आदेश** –

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

( श्रीमती एन.बी.घाटगे )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड.

दिनांकः १८/०३/२०२५